पशुधन हिताय बहुजन सुखाय

पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद नांदेड
जिल्हा व सत्र न्यायालयासमोर नांदेड

Phone ०२४६२ २३४०१० Email ID-dahonanded@gmail.com

---

जा.क्र.जिपनां/पशुसंवि/आस्था-२/ ७१२ /२०२४ कार्यालय पशुसंवर्धन विभाग ,जिल्हा परिषद नांदेड दि. १३.०५.२०२४

प्रति,

**पशुधन विकास अधिकारी (वि)**
पंचायत समिती सर्व जि.नांदेड

**विषय:- सर्वसाधारण बदल्या सन २०२४ मधील प्राथमिक वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द करणे बाबत.**

संदर्भ:- १.ग्राम विकास विभाग शा.नि.क्र जिपब/प्र.क्र.११२/आस्था१४ दि.१५.०५.२०१४.
२.शासन शुध्दीपत्रक जिपब/४८१६/प्र.क्र.१६/आस्था १४ दिनांक ०२.०१.२०१७.
३.शासन पुरकपत्र क्र जिपब/४८१७/प्र.क्र.२२८/आस्था १४ दि.०४.०३.२०१९
४.जाक्रजिपना/साप्रवि/आस्थार२ब/२०५६/२०२४ दि.१०.०४.२०२४.
५.या कार्यालयाचे पत्र क्र.६३७ दिनांक १५.०४.२०२४.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, सर्वसाधारण बदल्या सन २०२४ च्या अनुषंगाने पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत कार्यरत सहायक पशुधन विकास अधिकारी व पशुधन पर्यवेक्षक या संवर्गाची दिनांक ३१.०५.२०२४ अखेरची प्राथमिक वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात येत असुन, सदरची यादी तालुका स्तरावर प्रसिध्द करुन आपल्या कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी १, २ व पंचायत समिती वरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणुन देण्यात यावी. तसेच प्रसिध्द केलेल्या यादीवर आक्षेप असल्यास आपणाकडे प्राप्त आक्षेपाची मुळ सेवा पुस्तीका व कार्यालयातील इतर अभिलेख्यावरुन आपण स्वत: खात्री करावी व आक्षेप योग्य असल्यास पुराव्यासह व आपल्या अभिप्रायासह संपुर्ण तालुक्याचा एकत्रित अहवाल या कार्यालयास प्राथमिक वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिधद झालेल्या दिनांकापासुन चार दिवसाचे आत पशुसंवर्धन विभागास सादर करावेत. तसेच आपल्या तालुक्यातील सर्व सपविअ व पधप यांनी थेट आक्षेप पत्र सादर करु नयेत अशा सक्त सुचना आपल्या स्तरावरुन निर्गमित कराव्यात.

आपण स्वत: खात्री न करता व पुरावे सोबत सादर न करता आक्षेप पत्र पशुसंवर्धन विभागास सादर केल्यास आपण सादर केलेल्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व याबाबत आपणास वेगळयाने कळविण्यात येणार नाही.

तसेच आपण विहीत कालावधीत बदल्या संबधीत माहिती सादर न केल्यास बदल्यादरम्यान अचुक माहितीबाबत अनियमितता झाल्याचे निदर्शनास आल्यास आपल्या विरुध्द नियमानुसार कार्यवाही प्रस्तवीत करण्यात येईल याची गांर्भियाने नोंद घ्यावी.

**सोबत:- सपविअ व पधप यांची प्राथमिक वास्तव्य जेष्ठता यादी.**

( डॉ.बी.यु.बोधनकर )
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद नांदेड करीता

**स्थळ प्रतीवर मा.मु.का.अ.यांची स्वाक्षरी असे/-**

प्रतिलीपी

आवक शाखा पशुसवर्धन विभाग यांना देऊन कळविण्यात येते की, सपविअ व पधप यांनी थेट आक्षेप पत्र सादर केल्यास तसे आक्षेप स्विकारु नयेत. तसेच पशुधन विकास अधिकारी (वि) यांनी सोबत पुरावे न जोडलेले व त्यांचे स्पष्ट अभिप्राय नसलेले आक्षेप सादर केल्यास तसे आक्षेपसुध्दा स्विकारु नयेत.

**स्वाक्षरीत/-**
**(मिनल करनवाल भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद नांदेड